सत्याला वाचा फोडणारे... अन्यायाच्या विरुद्ध लढणारे...

# सत्य लढा

साप्ताहिक

सत्य लढा आता लवकरच दैनिक स्वरुपात...
अकोल्यातील भ्रष्टाचाराचा
भंडाभोड करण्याकरिता
आता सत्य लढा दररोज
आपल्या भेटीला...

संपादक : सतिश भाऊराव देशमुख मो. 9970321817 / 8767671183

RNI No. : MAHMAR/2020/79374
Postal Regd. No.: Akola Dn./273/2021-23

सहसंपादक : अथर्व सतीश देशमुख ▮कार्यालय : टी-१९, ३ रा माळा, दर्याव हाईटस्, गांधी रोड, अकोला.▮ E-Mail : satishbdeshmukh77@gmail.com

वर्ष ४ थे | अंक : १९ वा | अकोला : गुरुवार दि. १८ जानेवारी २०२४ | पृष्ठे ४ | किंमत १ रुपये

# सखोल स्वच्छता मोहीमेच्या नावावर मनपातील कर्मचारी गायब !

**• कनिष्ठ कर्मचाऱ्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांची सुद्धा दांडी • नावापुरते काढले जात आहे जीपीएसचे फोटो • सर्वसामान्य नागरीकांचे कामाकरिता माराव्या लागत आहेत चकरा • कर्मचारी-अधिकाऱ्यांची स्वच्छतेच्या नावावर मौज मजा • आयुक्त प्रत्यक्ष स्थळी भेटी देत नसल्यामुळे कर्मचाऱ्यांची चांदी • सखोल स्वच्छता दिसत आहे केवळ कागदोपत्री • महानगरात प्रत्यक्षात स्वच्छतेचा अभाव • आयुक्त प्रत्यक्ष स्वच्छतेच्या ठिकाणी भेटी देतील का? • जंपींगवाल्या अधिकाऱ्यांच्या भरोवश्यावर एसी कॅबीनमध्ये बसुन कशी होणार सखोल स्वच्छता?**

**सतीश देशमुख**

अकोला – अकोला महानगरपालिका सध्या सखोल स्वच्छता मोहीमेवर लागली असून अकोला महानगरपालिकेतील कर्मचारी ज्याला विचारात तो स्वच्छतेच्या कामी असल्याचे सांगत असून अकोला महानगरपालिके मध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती नगण्य असून अकोला महानगरपालिकेचे बहुतांश कर्मचारी हे स्वच्छतेच्या नावावर सुट्या साजऱ्या करुन पार्ट्या करण्यात मग्न असल्याची खळबळजनक माहिती हाती आली आहे.

अकोला महानगरपालिका सखोल स्वच्छता मोहीम राबवित असून आयुक्तांनी मनपातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या ड्युट्या ह्या विविध ठिकाणी स्वच्छतेच्या कामी लावल्या असून अकोला महानगरपालिकेमध्ये प्रत्येक विभागामध्ये हलचल रजिस्टर नदारद दिसून येत आहे. हलचल रजिस्टरच उपलब्ध नसल्यामुळे कोणता कर्मचारी कुठे कोणत्या कामाकरिता गेला आहे. याविषयी खुद्द विभाग प्रमुखाला सुद्धा माहिती नसल्याची बाब उघड होत आहे.

शासनाच्या प्रत्येक कार्यालयामध्ये प्रत्येक विभाग निहाय हलचल रजिस्टर ठेवण्यात येत असते या हलचल रजिस्टर अंतर्गत कर्मचारी ड्युटीवर येवून मस्टरवर सही केल्यानंतर तो घरी जाई पर्यंत कार्यालयात उपस्थित असतो असे ग्राह्य धरल्या जात असते. परंतु ड्युटी सुरु झाल्यानंतर मधल्या काळामध्ये वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कुठल्या कामाकरिता पाठविले असता ह्या हलचल रजिस्टरमध्ये नोंद करुन कोणता कर्मचारी कोणत्या कामाकरिता किती वेळा करिता गेला आहे याची नोंद या हलचल रजिस्टरमध्ये राहत असते. परंतु सब गोलमाल है करत अकोला महानगरपालिकेअंतर्गत प्रत्येक विभागामधून हलचल रजिस्टर मुद्दामपणे गायब करण्यात आलेले असून कुठल्याही विभागामध्ये हलचल रजिस्टर नसल्यामुळे सकाळी येऊन मस्टरवर सही करुन आपली उपस्थिती लावून दिवसभर मनात येईल तिथे फिरत राहा अथवा सकाळी ९.४५ ते संध्या. ६ वाजेपर्यंत कुठेही फिरा परंतु संध्याकाळी येऊन पुन्हा सही करुन द्या म्हणजे त्या दिवसाची तुमची हजेरी लागली. अशी परिस्थिती सध्या अकोला महानगरपालिकेअंतर्गत होत असल्याचे दिसून येत आहे.

अकोला महानगरपालिकेचे कर्मचारी हे दिवसभर इकडे तिकडे आपल्या वैयक्तीक कामानिमित्त दिसून येतात. ते करत असतात वैयक्तीक काम मात्र, महानगरपालिकेच्या दप्तरी ते आपल्या कर्तव्यावर कार्यरत असतात असा सगळा ऑलवेल कारभार हा अकोला महानगरपालिकेचा सुरु असून या वर वॉच ठेवण्याकरिता मनपा आयुक्त तथा प्रशासक यांनी नियुक्त केलेले आहेत जंपींगवाले अधिकारी, या जंपींगवाल्या अधिकाऱ्यांना कुठलेही कनिष्ठ कर्मचारी जुमानत नसल्याचे चित्र सुद्धा दिसून येत आहे. कारण जेवढे काही जंपींगवाले वरिष्ठ अधिकारी आहेत हे जंपींग प्रमोशनने वरिष्ठ स्तरापर्यंत पोहोचलेले आहे. यामध्ये कुली, शिपाई, ड्रायव्हर या पदावरुन जंप करुन ते वरिष्ठ पदावर पोहोचलेले आहेत. सध्या जे कनिष्ठ कर्मचारी आहेत त्यांच्या हाताखाली कुली, शिपाई, ड्रायव्हरचे काम करणारे चतुर्थश्रेणी कर्मचारी हे जंपींग प्रमोशन घेवून वरिष्ठ पदावर जावून बसले आहेत. त्यामुळे त्यांना कोण जुमानणार? हा सुद्धा मोठा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे.

जंपींग प्रमोशनवाल्या अधिकाऱ्यांमुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचा कुठलाही वचक हा अकोला महानगरपालिकेमध्ये सध्या उरलेला नसून जे खरोखर वरिष्ठ अधिकारी आहेत ते चिरीमिरीमुळे बदनाम झाले आहेत या चिरीमिरीमुळे ''तेरी भी चुप मेरी भी चुप'' ची सर्वत्र बोलबाला दिसून येत असून ''चोर चोर मैसेरे भाई'' या उक्तीनुसार कोण कोणाला काम सांगणार? व कोण कोणाच्या विरोधात तक्रार करणार? कारण सगळ्यांचे कबाडे हे एकमेकांना माहित असल्यामुळे साखळी पद्धतीने सर्व कारभार सुरु असल्यामुळे वरिष्ठापासून तर खालपर्यंत सर्व काही ऑलवेल सुरु आहे.

सकाळी या मस्टरवर सही करा व दिवसभर कुठेही फिरा कोणी विचारणारे नाही? अशी मजेशीर ड्युटी सध्या अकोला महानगरपालिकेत सुरु असल्यामुळे अकोला महानगरपालिकेतील अनेक अधिकारी-कर्मचारी हे व्याजबट्ट्याचे धंदे, प्लॉट खरेदी विक्रीचे धंदे व इतरही खाजगी व्यवसाय करीत असल्याचे दिसून येत आहे. यांच्यावर कुणाचेही वॉच नसल्यामुळेच हे सर्व कारभार चालत आहेत व आयुक्त तथा प्रशासक जंपींग प्रमोशनवाल्या अधिकाऱ्यांच्या भरोवश्यावर मस्त एसी कॅबीनमध्ये बसून अकोला महानगरपालिकेचा गाढा ओढत असल्याचे दिसून येत आहे.

फक्त कागदोपत्री सर्व योजना राबवाव्या व तथा कार्यपालन अहवाल हा वरिष्ठांकडे पाठवून मोकळे व्हायचे या सर्व कार्यपद्धतीमुळे शहराचे पार वाटोळे होत असून विकासाच्या नावावर मोठ्या प्रमाणात निधी हा अकोला महानगरपालिकेअंतर्गत येत असून कुठलाही दर्जा नसलेले कार्य सध्या महानगरात होत असल्याचे दिसून येत आहे. कारण कमिशनखोरीमुळे कोणीच कोणाच्या कामाच्या गुणवत्तेबद्दल लक्ष देण्यास तयार नाही. कुठल्याही टेबलवर वजन ठेवल्याशिवाय फाईली पुढे सरकत नसल्यामुळे ठेकेदारांना सुद्धा माहिती आहे की, काम कसेही करा फक्त फाईलवर वजन ठेवले की बिले ताबडतोब पास होऊन पैसे आपल्या खात्यात जमा होतात.

त्यामुळे आयुक्तांनी केवळ एसी कॅबीनमध्ये बसून कागदोपत्री व फोटो सेशन न करता ग्राऊंड लेव्हलवर जाऊन सर्व कार्यपद्धती पाहून कामाच्या दर्जाकडे सुद्धा लक्ष देण्याची मागणी महानगरातील नागरीक करीत आहेत.

### ...अखेर मनपा क्षेत्रीय अधिकाऱ्यांची वाहने डेपोत जमा!

अकोला मनपा क्षेत्रीय अधिकाऱ्यांना वाहन ही अकोला महानगरपालिकेच्या कामाकरिता देण्यात आलेली होती. मात्र अनेक अधिकाऱ्यांची वाहने ही खाजगी कामाकरिता वापरली जात असल्याची बाब सत्य लढाने अनेकदा उजेडात आणली होती. त्याची दखल घेत प्रशासनाने सर्व अधिकाऱ्यांच्या शासकीय वाहने ही डेपोमध्ये जमा करण्याच्या सुचना दिल्या असल्यामुळे खाजगी बाहेरगावचे दौरे करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांची मोठी पंचाईत झाली आहे.

# देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा विराजमान होण्याचा निर्धार

अकोला, – देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान पदी तिसऱ्यांदा विराजमान होण्याचा निर्धार देशातील १४० कोटी जनतेने घेतला आहे या मध्ये आपला खारीचा वाटा हवा यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आतापासून कामाला लागा असे आवाहन अकोला जिल्हा पालकमंत्री व राज्याचे महसूल पशु संवर्धन मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले बाळापुर रोड येथे आयोजित भारतीय जनता पार्टी अकोला महानगर जिल्हा भारतीय जनता पक्षाच्या कार्यकारिणीच्या बैठकीत ते बोलत होते तसेच

हेल्मेट सक्ती करणार नाही



यासंदर्भात पोलीस प्रशासनाला आदेश देण्यात येणार असे अभिवचन त्यांनी दिले या संदर्भात आमदार रणधीर सावरकर यांनी लक्ष वेधून ज्या भागात एक्सीडेंट होतात त्या भागाचा विश्लेषण करून त्या भागात हेल्मेटचा सक्ती करण्यात यावी अशी मागणी केली, यावेळी विखे पाटील म्हणाले अकोल्यात ६२ टक्के पेक्षा जास्त मतं मिळवण्याच्या दृष्टीने कामाला लागा असे आवाहन केले.

प्रभू रामचंद्राचा प्राणप्रतिष्ठा सोहळा जिल्ह्यात मोठ्या उत्साहाने साजरा करा देशभरातील लोक साजरा करत असताना भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता हा मागे राहणार नाही असा त्यांनी सांगितले यावेळी त्यांनी सोशल मीडियाचा महत्व प्रिंट मीडियाचा महत्त्व तसेच वेगवेगळ्या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले

दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी बाळापूर रोडवरील तुषार सेलिब्रेशन येथे भाजपचा कार्यकारणी मेळावा संपन्न झाला.

# स्वच्छता मोहिम ही लोकचळवळ व्हावी - पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील



अकोला - जिल्ह्यात धार्मिक स्थळे, शहरे व ग्रामीण भागात सखोल स्वच्छता मोहिम राबवावी, तसेच निरंतर व सातत्यपूर्ण स्वच्छतेसाठी सफाई मोहिम ही लोकचळवळ व्हावी, असे आवाहन राज्याचे महसूलमंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे केले.

शहरी व ग्रामीण भागात, तसेच धार्मिक स्थळांमध्ये स्वच्छता अभियान राबविणे, महिला सशक्तीकरण अभियान आदींबाबत आढावा बैठक पालकमंत्री श्री. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली विविध विषयांची बैठक नियोजनभवनात झाली, त्यावेळी ते बोलत होते. महापालिका आयुक्त कविता द्विवेदी, अतिरिक्त जिल्हाधिकारी रामदास सिद्धभट्टी, अतिरिक्त जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी विनय ठमके, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू शरद गडाख, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील व विविध यंत्रणांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. विखे पाटील म्हणाले की, अयोध्या येथे येत्या २२ जानेवारीला श्री राम मंदिरात प्राण प्रतिष्ठापना होणार आहे, हे सर्वासाठी अभिमानास्पद आहे. यानिमित्त शहरी, तसेच ग्रामीण भागात सखोल स्वच्छता मोहिम राबवावी. परिसरात निर्माण होणारा कच-याच्या विल्हेवाटीसाठी यंत्रणा, ओला, सुका कचरा वर्गीकरण यादृष्टीने आवश्यक तरतुदी व्हाव्यात. निरंतर स्वच्छतेसाठी त्याबाबत प्रभावी जनजागृती व्हावी.सुशोभीकरणाची कामे राबवावीत. मंदिर परिसरातही विशेष स्वच्छता मोहिम राबवून विद्युत रोषणाई करण्यात यावी. गावोगाव प्रभातफेरी, रांगोळ्या असे उपक्रम लोकसहभाग मिळवून व्हावेत. रोषणाईसाठी मंदिरांना जिल्हा नियोजन समिती माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, असे निर्देश त्यांनी दिले.राज्यातील महिलांच्या सबलीकरणासाठी महिला सशक्तीकरण अभियान राबविण्यात येत आहे. महिला बचत गटांच्या उत्पादित वस्तूंच्या विपणनासाठी व ब्रँडिंगसाठी सर्वकष प्रयत्न करावेत. प्रत्येक रूग्णालयात हिरकणी कक्ष उघडण्यात यावा, असेही निर्देश त्यांनी दिले. महापालिकेतर्फे स्वच्छता मोहिमेचे सादरीकरण आयुक्त श्रीमती द्विवेदी यांनी यावेळी केले. शहरात १२ एकर जागेवरील बायोमायनिंग प्रकल्पाबाबत माहिती त्यांनी दिली.

शासनाच्या नविन वाळू धोरणानुसार जिल्ह्यातील ३६ वाळूघाटांसाठी ११ डेपो निश्चित करण्यात आले आहेत. त्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. त्यात मंजूर झालेल्या मूर्तिजापूर तालुक्यातील ताकवाडा डेपोसाठी सागर बजाज यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते कार्यारंभ आदेश यावेळी देण्यात आला.

## सखोल स्वच्छतेमध्ये अनेक वर्षांपासून साचलेला सर्व्हिस लाईनमधला कचरा होईल का साफ?

अकोला - सध्या महानगरपालिका अंतर्गत सखोल स्वच्छता अभियान सुरु असून या स्वच्छता अभियानामध्ये केवळ दर्शनिय ठिकाणची स्वच्छता होत असून यामध्ये पुर्व झोन अंतर्गत येत असलेल्या पाडीया कॉम्प्लेक्सच्या मागील भागातील श्रावगी प्लॉट येथे सर्व्हिस लाईनची साफसफाई ही अनेक वर्षापासून प्रलंबित असून या सखोल स्वच्छता माहिमेमध्ये तरी या सर्व्हिस लाईनची साफसफाई होईल का? असा प्रश्न सर्वसामान्य नागरीकांना पडला आहे.



# अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांचे जिल्हाकचेरी समोर प्रलंबित मागण्यांसाठी निर्दशने व चटणी भाकर खात आंदोलन



**दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी अकोला जिल्हाधिकारी कार्यालय समोर आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले, या आंदोलनात या दरम्यान आयटक संघटनेच्या अंगणवाडी सेविकांनी निर्दर्शने केली तसेच वाशीम अकोला येथील आशा वर्कर यांनी चटणी भाकर खात शासनाचा निषेध नोंदवला. यावेळी अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा पातूरात जे.सी.बी.ने फुल उधळून भव्य सत्कार



अकोला - (किरण कुमार निमकंडे कडून) केंद्रीय सामाजिक न्याय अधिकारिता मंत्री भारत सरकार तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नामदार रामदासजी आठवले यांचा पातूर येथे रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे जिल्हासंघटक आकाश हिवराळे यांच्या नेतृत्वाखाली भव्य सत्कार आयोजित करण्यात आला होता.ह्यावेळी जे.सी.बी ने फुलांचा वर्षाव करून स्वागत करण्यात आले व क्रेन च्या साहाय्याने ९० किलो चा हार व फेटा व शाल बांधून भव्य सत्कार करण्यात आला.ह्यावेळी शिर्ला ग्रा.पं. सदस्य मंगल डोंगरे,पातूर तालुका अध्यक्ष पंडित सदार, उपस्थित होते हरिष गुडधे, वैभव अवचार, गुलाबराव हिवराळे,रामभाऊ सिरसाट,प्रेमानंद इंगळे, आदित्य अवचार, अनिरुद्ध हिवराळे, अनुप खांडेकर, सतीश डेरे, उज्वल सिरसाट,प्रमोद डोंगरे, उज्वल अवचार,पवन तांबे, सम्राट तायडे,निलेश हिवराळे, अनंता हिवराळे, सोनपाल डोंगरे, आदिंसह असंख्य कार्यकर्ते महिला व जेष्ठ नागरिक हजारों च्या संख्येने उपस्थित होते.

# अकोला मार्गे प्रयागराज, अयोध्या रेल्वे सुरू करा - महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, व दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद यांना निवेदन

अकोला - प्रवाशांना अन्य राज्यांत जाण्यासाठी रेल्वेची सुविधा उपलब्ध आहे, परंतु अकोलामार्गे प्रयागराज आणि अयोध्येला जाण्यासाठी अजूनही ट्रेनची सुविधा नाही. अयोध्येत २२ जानेवारी २०२४ रोजी श्री रामलला यांच्या भव्य मंदिराचे उद्घाटन होत आहे.त्यासाठी नांदेड,हिंगोली,वाशिम,अमरावती, अकोला, बुलढाणा येथील लाखो यात्रेकरू व भाविकांना अयोध्येत पोहचून श्री रामलला चे दर्शन घेता यावे यासाठी ट्रेन प्रयागराज, अयोध्येसाठी सुरू करण्यात यावी यामागणीसाठी आज महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे मुंबई आणि, दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद यांना अकोला वासियानी निवेदन दिले आहे. तसेच या मागणीची किती गरज आहे हे दाखवण्यासाठी आजच स्वाक्षरी मोहीम सुरु करण्यात आली आहे. ह्या मागणीची पूर्तता केली गेली नाही तर अकोला वासिय रास्ता रोको आंदोलन करणार असल्याचा इशाराही दिला आहे.



विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मध्य रेल्वे भुसावळ व दक्षिण मध्य रेल्वे नांदेड,रेल्वे स्थानक व्यवस्थापक, मध्य रेल्वे अकोला व दक्षिण मध्य रेल्वे, अकोला यांच्यामार्फत महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे मुंबई आणि, दक्षिण मध्य रेल्वे, सिकंदराबाद यांना अकोला वासियानी निवेदन दिले आहे यामध्ये अकोला जिल्हयातील रामभक्ताना अयोध्येत जाण्यासाठी रेल्वेगाडी ऊपलब्ध नाहीं. ही गाडी दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड पासुन तर मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागांकडून सुरु करण्यात यावी. यासोबतच ह्याचं मागणीसाठी आजपासुन स्वाक्षरी अभियान सुरु केले आहे. गाड्या ऊपलब्ध झाल्या तर राम भक्तांना अयोध्येत जाऊन राम मंदिरात दर्शनाचा लाभ मिळेल. त्यासाठी प्रयागराज, अयोध्या जाण्यासाठीच अकोला मार्गे ही गाडी सुरु न केल्यास रेल रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

बॉक्स

अयोध्येत राममंदिर उद्घाटन जानेवारी रोजी होत आहे. त्यासाठीच अकोल्यातील राम भक्त जाण्याची इच्छा करत असताना त्यांना अयोध्येला जाण्यासाठी गाड्याच नाहीत. त्या गाड्या सुरू करण्यात याव्यात यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शहर प्रमुख राजेश मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली आज निवेदन देण्यात आले असून याच मागणीसाठी स्वाक्षरी अभियान राबविण्यात येत आहे. यावेळी राजेश मिश्रा यांच्या नेतृत्वाखाली नंद गोपाल पांडे, हरिओम पांडे, माणिकचंद मौर्य, अनिल शुक्ला, सुशीकुमार पांडे, चंद्र शेखर पांडे, रवी मडावी, सुरेन्द्र मिश्रा, श्याम पांडे, धर्मेंद्र शुक्ला, प्रधान मिश्रा, आनंद चौबे, अनिल ललवाणी, महेश मिश्रा, आकाश पाटिल, संदेश मालढाने आदींसह अनेक राम भक्त उपस्थीत होते.

# जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांसाठी विद्युत भवनात 'स्वागत सेल' सुरू



अकोला,– जिल्ह्यातील सर्व औदयोगिक वीज ग्राहकांना तत्पर वीज सेवा देण्यासाठी विद्युत भवन अकोला येथे जिल्हा स्तरावर एक स्वतंत्र 'स्वागत सेल' सुरू करण्यात आले आहे.एम.एस.ई.बी. सूत्रधारी कंपनिचे स्वतंत्र संचालक श्री.आशिष चंदाराणा यांच्या हस्ते या सेलचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर,अधीक्षक अभियंता पवनकुमार कछोट,अनिल वाकोडे, इंडस्ट्रीयल असोशिएशन अकोला चे अध्यक्ष उन्मेश मालू,सचिव नितिन बियाणी,विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स अकोलाचे अध्यक्ष निकेश गुप्ता,सचिव निरव बोरा,लघु उद्योग भारती अध्यक्ष पंकज बियाणी,सचिव अमित सराफ यांच्यासह उद्योजक व औद्योगिक संघटना प्रतिनिधींची उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलतांना स्वतंत्र संचालक आशिष चंदाराणा म्हणाले की, राज्याचे ऊर्जामंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून उद्योजकांना अधिक तत्पर सेवा देण्यासाठी ' स्वागत सेल' ची निर्मिती राज्यातील सर्वच जिल्ह्यात करण्यात आली आहे. अकोल्यातील उद्योजकांना कायम उत्तम सेवा देण्याचा महावितरणच्या प्रयत्नाबद्दल यावेळी त्यांनी कौतूक केले.पुढे बोलतांना ते म्हणाले की, राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या दुरदृष्टितून राज्यात पर्यंतचे मेगा वॅट वीज निर्मिती,पारेषण आणि वितरणाचे नियोजन करण्यात आले असुन येत्या एप्रिल महिन्यापर्यंत त्याबाबत आराखडा तयार करण्यात येणार आहे.

महावितरणच्या महसुलाचा औद्योगिक ग्राहक प्रमुख स्रोत आहे.त्यामुळे जिल्ह्यातील या सर्व ग्राहकांना 'स्वागत सेल' च्या माध्यमातून डोअर स्टेप सेवा देण्यासाठी महावितरणचे पूर्ण प्रयत्न राहणार आहे. 'स्वागत सेल'मुळे औद्योगिक ग्राहकांना विजसेवा व तक्रारींसाठी स्थानिक कार्यालयाऐवजी आता थेट मंडल स्तरावर संपर्क साधता येणार असल्याचे यावेळी मुख्य अभियंता दत्तात्रय पडळकर यांनी सांगितले.

अधीक्षक अभियंता पवनकुमार कछोट यांनी स्वागत सेलबाबत व त्याच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर माहिती दिली.

**'स्वागत सेल' साठी संपर्क** – जिल्ह्यातील औद्योगिक ग्राहकांना तत्पर सेवेसाठी सुरू करण्यात आलेल्या 'स्वागत सेल' ला संपर्क करण्यासाठी औद्योगिक वीज ग्राहकांनी_. ईमेल आय डी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**स्वागत सेल ची कार्य-पद्धती** – 'स्वागत सेल' चे प्रमुख म्हणून कार्यकारी अभियंता प्रशासन काम पाहणार आहे. ईमेल आयडीच्या माध्यमातून या सेलकडे संपर्क साधल्यानंतर औद्योगिक ग्राहकांच्या बिलिंग व वीजपुरवठ्याच्या तक्रारींचे ताबडतोब निराकरण करण्यात येईल. तसेच नवीन वीजजोडणी, भार वाढ व इतर सेवा देण्यासाठी थेट ग्राहक दारी जाऊन कागदपत्रांची पूर्तता करण्यासह विनाविलंब सेवा दिली जाणार आहे.

# अधीक्षक अभियंता सा. बां. कार्यालयासमोर फटाके फोडून शेतकरी पुत्र गोपाल पोहरे यांचे अनोखे आंदोलन



अकोला – गेल्या सात वर्षांपासून भ्रष्टाचाराचा कळस ठरलेल्या शेगांव पालखी रस्त्याचे ह्याम प्रोजेक्ट चे काम कासव गतीने सुरु आहे,या मार्गावर प्रवासी नागरिकांसाठी डोके दुःखी ठरत असून प्राणघातक ठरत आहे या मार्गावर अपघाताची शृंखला सुरू असून किती तरी लोकांना अपंगत्व आले आहे ,तरी हा मार्ग कासव गतीने बांधणे सुरूच आहे या बाबत शेतकरी पुत्र गोपाल पोहरे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अविनाश घोंडगे यांना निवेदनाद्वारे हा मार्ग लवकरात लवकर तयार करावा असे खूप वेळा निवेदने दिलीत त्यावर फक्त आश्वासने देण्यात आली मात्र अध्यपही हा मार्ग कासव गतीने बांधणे सुरुच आहे त्यामुळे झोपलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाला उठविण्यासाठी शेतकरी पुत्र गोपाल पोहरे यांनी आज दिनांक १६ जानेवारी रोजी दुपारी ५ वाजता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता अविनाश धोंडगे यांच्या कार्यालय समोर फटाके फोडून ह्या मार्गाचा दिनांक १७ जानेवारी रोजी ८ वा वाढदिवस साजरा करण्यात येणार असल्याचे 'निमंत्रण पत्रिका'देत अनोखे आंदोलन केले आहे.

# अकोला शहरातील नेहरू पार्क चौक येथे गोर सेनेचे रास्ता रोको !



अकोला – शहरातील नेहरू पार्क चौक येथे आज गोर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात आले, सदरच्या आंदोलन ची सुरुवात ही अशोक वाटिका इथून मोर्चा काढून नेहरू पार्क चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. विमुक्त जाती–अ प्रवर्गात अवैध मार्गाने खोटे जात वैधता प्रमाणपत्र घेणाऱ्या व वितरित करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर व लाभार्थींवर कारवाई करण्यासाठी विशेष तपासणी पथक म्हणजेच एसआयटी लागू करण्यात यावी, संपूर्ण महाराष्ट्रमध्ये प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जात वैधता पडताळणी समितीमध्ये विजा अ प्रवर्गातील एक शासकीय प्रतिनिधी नेमण्यात यावा, २०१७ चा रक्त नातेसंबंधीचा जीआर त्वरित रद्द करण्यात यावा, दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रात मूळ राजपूत भामटा व व्ही जे अ प्रवर्गातील सर्व जातीचे लोक प्रत्यक्षात कुठे निवासी राहतात त्या तालुका व जिल्हा लिहा यादी बार्टी करून जाहीर करण्यात यावी, या व इतर मागण्या यावेळी आंदोलनकर्त्यांनी रेटून धरल्या होत्या. सदर रास्ता रोको आंदोलनाच्या वेळी पोलिसांनी बॅरिगेट लावून रस्ता अडवल्याने आंदोलनकारी आक्रमक झाल्याची यावेळी पोलिसांनी बॅरिगेटिंग काढताच नेहरू पार्क चौकात शेकडोच्या संख्येने बंजारा समाजाच्या बांधवांनी रास्ता रोको आंदोलन केला. यावेळी बंजारा समाजाच्या महिला पारंपारिक वेशभूषेत उपस्तीत होत्या. बंजारा समाजाच्या मागण्या शासनाने मान्य न केल्यास येणाऱ्या २०२४ च्या निवडणुकीत सरकारला त्यांची जागा दाखवून देऊ अशा तीव्र स्वरूपाची प्रतिक्रिया सुद्धा सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष संदेश चव्हाण यांनी दिली

# आगामी लोकसभेत जनतेने काँग्रेसवर बहिष्कार टाकावा ! - ना.रामदास आठवले





अकोला – रामदास आठवले यांचा वंचित बहुजन आघाडीचे प्रकाश आंबेडकर यांच्याप्रति प्रेम पुन्हा उफळून आल्याचं दिसून येत आहेय..आठवले यांच्या अकोला दौऱ्या दरम्यान त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या,

अकोला लोकसभेच्या जागेवर आपण दावा करणार नसल्याचं आठवले म्हणाले तर ही जागा आपण प्रकाश आंबेडकरांसाठी सोडणार असल्याचंही ते म्हणाले..त्यांनी प्रकाश आंबेडकर यांनी एनडीए मध्ये यावे म्हणत ते एनडीए मध्ये आल्यास आपण आपली जागा त्यांना देण्यास तयार असल्याचं ही आठवले म्हणाले...प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीला १२–१२–१२–१२ चा दिलेला फरमूल्याला आठवले यांनी पाठिंबा दिलाय..राज्यसरकार वर बोलतांना मंत्रिमंडळ विस्तारात आम्हालाही मंत्रिपद द्यावं म्हणत विस्तारत अजित पवार गटाच अधिक विस्तार झालं म्हणत त्यांनी टोला लगावला...अयोध्या येथील राम मंदिराच्या कार्यक्रमात सोनिया गांधी , मल्लिकार्जुन खर्गे यांनी राजकारण बाजूला ठेऊन यावं असा सल्लाही त्यांनी काँग्रेसला दिला तर ते या सोहळ्यात उपस्थित न राहिल्यास आगामी

लोकसभेत जनतेने काँग्रेसवर बहिष्कार टाकावा असा आवाहन केलाय.

**बाळासाहेब आंबेडकर यांनी एनडीए आघाडीत असल्यास माझे मंत्रीपद देणार!**

केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे पत्रकार परिषदेत आवाहन

राहुल गांधी यांना दलित मुलीशी लग्न करण्याचा सल्ला !

प्रकाश आंबेडकर एनडीए आघाडीत आल्यास माझे मंत्रिपद त्यांना देण्यास तयार असल्याचे आवाहन केंद्रिय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी अकोल्यातील पत्रकार परिषदेत केले.

बाळासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात रिपब्लिकन पक्षातील सर्व घटकांनी एकत्रित यावे, त्यापूर्वी प्रकाश आंबेडकर यांच्या तिन्ही भावांचे जे वेगवेगळे पक्ष आहेत, त्यांनी सर्वप्रथम आपल्या तिन भावना एकत्रित आणावे व रिपब्लीकन आघाडीचे नेतृत्व करावे असा सल्लाही त्यांनी दिलाय.

राहुल गांधी सध्या एकटे असून त्यांना साथीदाराची गरज आहे. दलित समाजात अनेक उच्चशिक्षित मुली असून त्यांनी दलित समाजातील मुलीशी लग्न करण्याचा सल्ला रामदास आठवले यांनी दिलाय.

Published by **Satish Bhaurao Deshmukh** (name of owner) and Printed by Rajendra Jagannath Deshmukh at **Rajendra Printers,** Bara Jyotirling Mandir Road, Akola - 444 001 (M.S.) and published at C/o. Deshmukh Floor Mill, Jawahar Nagar, Akola Tal. & Dist. Akola. - 444 001 (M.S.) ■ **Editor : Satish Bhaurao Deshmukh Mob. : 9970321817**

''मुद्रक राजेंद्र जगन्नाथ देशमुख तथा प्रकाशक सतिश भाऊराव देशमुख द्वारा राजेंद्र प्रिंटर्स, बारा ज्योतिर्लिंग मंदिर रोड, रणपिसे नगर, अकोला येथून मुद्रीत करून कार्यालय द्वारा देशमुख फ्लोअर मिल जवाहर नगर, अकोला ता.जि.अकोला–४४४००१ (महा.) येथून प्रकाशित केले. ● संपादक : सतिश भाऊराव देशमुख मो. 9970321817